दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | रविवार दि.२१ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक ११९ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Sunday 21 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 119 | Pages 4 | Rate 4 Rs

### पवारांनीच भुजबळांना तुरुंगात पाठवले

**मुंबई**–सुप्रिया सुळे यांचे बंधू म्हणजे अजित पवार यांनी ७० हजार कोटींचा घोटाळा केला. तेव्हा त्या गप्प का गप्प होत्या? त्यांनी स्वतःच्या भावाविरोधात आंदोलन का केले नाही? पार्थ पवार यांनी महार वतनाची जमीन घेण्याचा प्रयत्न केला. त्यानंतरही सुप्रिया सुळेंनी त्यांना क्लीनचिट दिली. ओबीसी नेते छगन भुजबळ यांना तुरुंगात पाठवण्यामागे शरद पवार व सुप्रिया सुळे यांचेच षडयंत्र होते. पवार कुटुंब जातीवादी आहे. त्यांना दलित, मुस्लिम, ओबीसी व आदिवासी समाज चालत नाही. सुप्रिया सुळे यांचा पक्ष आता संपला आहे. ओबीसी समाजाने त्यांना त्यांची जागा दाखवण्याचा निर्णय घेतला आहे. आगामी काळात त्यांचा पक्ष होत्याचा नव्हता होईल, असे नवनाथ वाघमारे यांनी म्हटले आहे.

# नवी मुंबई विमानतळाला दि.बा.पाटील यांचे नाव द्या, दुसरे कोणतेही नाव खपवून घेणार नाही-हर्षवर्धन सपकाळ

## २२ डिसेंबर रोजीच्या आंदोलनात काँग्रेसचा सक्रीय सहभाग;सातारा ड्रग्स कारखाना प्रकरणी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेचा राजीनामा घ्या!

### ए.मडी ड्रग्ज प्रकरणी एकनाथ शिंदेंचा राजीनामा घ्या..

**सातारा जिल्ह्यातील सावरी गावात एमडी ड्रग्जचा कारखाना उघड झाला असून ज्या जागेत हा काळा धंदा सुरु होता ती जागा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या भावाच्या नावावर आहे. हा प्रकार सर्वात प्रथम काँग्रेस पक्षाने उघड करून कठोर कारवाईची मागणी केली होती. भ्रष्टाचाराचा पैसा कमी पडतो की काय म्हणून आता अंमली पदार्थांचा धंदा करुन पैसा मिळवला जात आहे. या सरकारला जनाची तर नाहीच पण मनाचीही नाही. एवढे सर्व उघड होऊनही एकनाथ शिंदे यांचा एमडी ड्रग्जच्या कारखान्याशी संबंध नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणतात. हा प्रकार अत्यंत गंभीर असून एकनाथ शिंदे यांचा राजीनामा घेतला पाहिजे, असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.**



दैनिक वादळ वार्ता
**मुंबई | प्रतिनिधी**

नवी मुंबई विमानतळाला भूमीपुत्र दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची लोकांची तीव्र भावना आहे, या भावनांचा आदर सरकारने केला पाहिजे. भाजपा महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जाणीवपूर्वक दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास टाळाटाळ करत आहेत, परंतु कोणत्याही परिस्थितीत दुसरे नाव खपवून घेतले जाणार नाही, वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून लढा देऊ, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, नवी मुंबईच्या विकासासाठी स्थानिकांनी जमिनी दिल्या व त्यावेळी भूमीपुत्राच्या हक्कांसाठी दि. बा. पाटील यांनी दिर्घ लढा दिला. १२.५ टक्के योजना ही दि. बा. पाटील यांच्या आंदोलनामुळेच शक्य झाली आहे. दि. बा. पाटील यांची आमदार व खासदार अशी प्रदिर्घ राजकीय कारकिर्द राहिली आहे. नवी मुंबईत, जेएनपीटी, नैना प्रकल्प, नवी मुंबई विमानतळ विकसीत होत असताना भूमिपुत्रांनी दिलेल्या योगदानाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी रास्त असून जनभावनेचा आदर केला पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरी दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचे आश्वासन दिले असले तरी त्यांचा कावा सर्वांना माहित आहे. 'फडणविसांचा कावा ना कळे ब्रम्हदेवा', असा आहे, असे सपकाळ म्हणाले. नवी मुंबई विमानतळाचा उल्लेख सध्या एनएम विमानतळ असा केला जात आहे. विमानतळाच्या कुंपनाच्या भिंतीवरही एनएम अक्षरे कोरली जात आहेत. हे एनएम म्हणजे नरेंद्र मोदी विमानतळ असे तर नाही ना असा दाट संशय बळावत चालला आहे. अहमबादच्या क्रिकेट स्टेडियमचे सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव बदलून नरेंद्र मोदी यांचे दिले आहे, पण असा कोणताही कावेबाज पणा भाजपा वा देवेंद्र फडणवीस यांनी करु नये. लोकसभेत काँग्रेसच्या खासदारांनी या प्रश्नी आवाज उठवला आहे, राज्यसभेतही ही मागणी लावून धरली जाईल, असे सपकाळ म्हणाले. या पत्रकार परिषदेला ज्येष्ठ नेते आर सी. घरत, रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत, पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुदाम पाटील, राजाभाऊ ठाकूर, फिशरमन काँग्रेसचे अध्यक्ष मार्तंड नाखवा यांच्यासह नवी मुंबई ठाणे रायगड परिसरातील काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

# शेवडी (बा.) गावाचा विकासाचा नवा अध्याय कोट्यवधींच्या निधीतून दर्जेदार कामे पूर्णत्वाकडे

दैनिक वादळ वार्ता
**लोहा | राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील शेवडी (बा.) येथे ग्रामपंचायत कार्यालयाच्या माध्यमातून जवळपास १५ कोटी रुपये खर्चाचा दुतर्फा सिमेंट रस्ता अत्यंत दर्जेदार व सुपर क्वालिटीचा होत असून काम जवळपास पूर्णत्वाच्या टप्प्यात व प्रगतीपथावर आहे. या रस्त्याची गुणवत्ता इतकी उत्कृष्ट आहे की रस्त्यावरून ये-जा करणारे वाहनचालक तसेच प्रवासी रस्त्याच्या मजबुतीचे आणि कामाच्या दर्जाचे मनापासून कौतुक करत आहेत. या विकासकामामुळे गावकऱ्यांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या सर्व विकासकामांचे श्रेय ग्रामपंचायतीचे सरपंच बसवेश्वर वैजनाथ धोंडे यांना जात असून, त्यांनी शेवडी गावाच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा करून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून आणला आहे. हा निधी शिवा संघटनेचे




संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष आणि सेवा जनशक्ती पार्टीचे पक्षप्रमुख आदरणीय प्रा. मनोहर धोंडे सर यांच्या माध्यमातून मंत्रिमंडळ व मंत्रालय स्तरावरून मंजूर करून घेण्यात आला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली गावात विकासकामे गुणवत्तापूर्ण पद्धतीने मार्गी लागली आहेत.याचबरोबर गावात जलजीवन मिशन अंतर्गत सुमारे ८ कोटी ५० लाख रुपयांची कामे वेगाने सुरू असून, घर तिथे नळ योजना प्रभावीपणे राबवली जात आहे. फिल्टर पाणीपुरवठा, पाण्याच्या टाक्या, नवीन जलवाहिन्या यामुळे गावातील पाणीपुरवठ्याची कायमस्वरूपी समस्या सुटण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले गेले आहे. तसेच ई. २०२१ ते २०२६ या कालावधीत मातोश्री पादान रस्ते, अंतर्गत रस्ते, नाले, मंदिरे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे इमारत काम, सरकारी दवाखाना यांच्या सह वैयक्तिक लाभाच्या अनेक योजना गावातील शेतकयांना व नागरिकांना देण्यात आल्या व इतर विविध विकासकामे मिळून अंदाजे ५० कोटी रुपयांची कामे शेवडी गावात सुरू आहेत. या सर्व कामांमुळे गावाचा सर्वांगीण विकास होत असून गावाचा चेहरा-मोहरा बदलत आहे.सरपंच बसवेश्वर वैजनाथ धोंडे व ग्रामपंचायत ची टिम यांच्या कार्यकुशल नेतृत्वामुळे व आदरणीय प्रा. मनोहर धोंडे सरांच्या आशीर्वादामुळे माजी सरपंच कैलास अण्णा धोंडे यांच्या मार्गदर्शनात येणाऱ्या काळात यापेक्षा अधिक निधी आणून शेवडी गावाच्या विकासाचा वेग आणखी वाढवण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. गावाच्या प्रगतीसाठी सुरू असलेली ही कामे निश्चितच कौतुकास्पद असून पंचक्रोशीतील नागरिकांमध्येही याचे सकारात्मक प्रतिबिंब उमटत आहे.शेवडी (बा.) गाव आज विकासाच्या मार्गावर आत्मविश्वासाने पुढे जात असून, या ऐतिहासिक विकासकामांमुळे गावकऱ्यांमध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# खा.बजरंग बप्पा सोनवणे यांच्याकडून राऊत कुटुंबियांची भेट घेऊन केले सांत्वन

**रळी वैजनाथ | प्रतिनिधी**

शहरातील किर्तीनगर येथील रहिवासी श्रीनिवास राऊत यांचे वडील कै.बबनराव पिलोबा राऊत यांचे दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी अपघाती दुःखद निधन झाले. यांच्या दुःखद निधनाबद्दल दि.१९ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटचे बीडचे खा.बजरंग बप्पा सोनवणे यांनी श्रीनिवास राऊत कुटुंबियांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. किर्तीनगर येथील रहिवासी श्रीनिवास राऊत यांचे वडील व नगर परिषद निवडणूकीतील २०२५ राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व मित्र पक्षाच्या प्रभाग क्रमांक ७ अ च्या उमेदवार राजामतीबाई बबनराव राऊत याचे पती कै.बबनराव पिलोबा राऊत यांचे परळी ते गंगाखेड रोडवर ऍटो पलटी होऊन अपघातात दि.१२ डिसेंबर रोजी अपघाती दुःखद निधन झाले.

कै.बबनराव पिलोबा राऊत हे अत्यंत मनमिळावू, सुस्वभावी तथा धार्मिक वृत्तीचे सर्वांसोबत स्नेहबंध जपणारे व्यक्तिमत्त्व होते. एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून ते प्रत्येक जणाच्या ओठावर कै.बबनराव पिलोबा राऊत यांनी ओळख निर्माण केली अतिशय गुणी व्यक्तिमत्व म्हणून परिचित होते.



कै.बबनराव पिलोबा राऊत यांच्या दुःखद निधनाबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटचे बीडचे खा.बजरंग बप्पा सोनवणे यांनी भेट घेऊन सांत्वन करून कुटुंबियांना धीर दिला. यावेळी खासदार बजरंग बाप्पा सोनवणे यांच्यासमवेत शहराध्यक्ष ऍड. जीवनराव देशमुख, दीपक नाना देशमुख, उत्तम दादा माने , अमित घाडगे , बाबा शिंदे , नितीन बागवाले, नितीन चव्हाण, धनंजय कराळे, वैजनाथ कळसकर ,अक्षय सोनवणे, अमर रोडे , सनी कसबे, प्रणित काळे, रमेश गायकवाड उपस्थितीत होते.

# नंदुरबार जिल्हा प्रगतीच्या शिखरावर आकांक्षित योजनांची पूर्ण क्षमतेने अंमलबजावणी करण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार | दिपक गोसावी**

आकांक्षित जिल्हा कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणारे उपक्रम अत्यंत प्रभावी असून, सर्व विभागांनी पूर्ण ताकदीने आणि परस्पर सहकार्याने काम केल्यास नंदुरबार जिल्हा राज्यात प्रथम क्रमांक पटकावू शकतो, असे प्रतिपादन भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाचे अतिरिक्त सचिव पियुष सिंह यांनी केले.पियुष सिंह यांच्या अध्यक्षतेखाली आकांक्षित जिल्हा आणि आकांक्षित तालुका कार्यक्रमाची आढावा बैठक पार पडली. या बैठकीस जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्ह्यात सुरू असलेल्या कामांच्या गुणवत्तेबाबत समाधान व्यक्त करताना अतिरिक्त सचिव म्हणाले की, ग्राम, तालुका आणि



जिल्हा स्तरावर सर्व विभागांनी एकत्र येऊन केलेल्या कामामुळेच हे यश मिळाले आहे. विकासाचा हाच वेग आणि दर्जा भविष्यातही टिकवून ठेवणे गरजेचे आहे.जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे जिल्ह्यातील विविध प्रकल्पांची सविस्तर माहिती दिली. यात प्रामुख्याने आरोग्य, अंगणवाडी, शेती, शेतकरी पतपत्रिका, कृषी माहिती कोश, दुचाकी रुग्णवाहिका, मत्स्यव्यवसाय, तोरणमाळ पर्यटन विकास, सिकलसेल रक्तक्षय निर्मूलन मोहीम, जलबंधू अभियान, आमची अभ्यासिका, आदर्श गाव आणि शाळा विकास यांसारख्या उपक्रमांचा समावेश होता.

**रक्तक्षय निर्मूलन मोहिमेचा प्रारंभ**

या बैठकीत सिकलसेल रक्तक्षय निर्मूलन मोहिमेच्या पुढील टप्प्याची सुरुवात करण्यात आली. यावेळी आशा कार्यकर्त्या प्रमिला गावीत व वंदना गावीत यांना अतिरिक्त सचिवांच्या हस्ते आरोग्य संचांचे वाटप करण्यात आले.

नंदुरबार जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आकांक्षित जिल्हा कार्यक्रम दिशादर्शक ठरत असून, पुढील काळात हे सर्व उपक्रम अधिक वेगाने राबविले जातील, असा ठाम विश्वास प्रशासनाद्वारे व्यक्त करण्यात आला.

# धुळे-सुरत महामार्गावर टँकरचा थरार! भीषण स्फोटाने परिसर हादरला; चालकासह क्लिनरचा जीव थोडक्यात वाचला

दैनिक वादळ वार्ता
**मोहसीन शेख | धुळे**

धुळे,सुरत राष्ट्रीय महामार्गावर शनिवारी दिनांक २० रोजी पहाटे मृत्यूचा थरार पाहायला मिळाला. मासलीपाडा शिवारात रसायनाने भरलेल्या एका टँकरला भीषण आग लागली. या आगीत टँकरच्या डिझेल टाकीचा मोठा स्फोट झाल्याने संपूर्ण परिसर हादरला होता. सुदैवाने, चालक आणि सहचालकाने वेळीच प्रसंगावधान दाखवल्याने मोठी जीवितहानी टळली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, टँकर क्रमांक (NL 01 AJ 2080) भुसावळहून सुरतकडे 'प्लायस' नावाचे रसायन वाहून नेत होता. शनिवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास मासलीपाडा शिवारात धावत्या टँकरच्या वायरिंगमध्ये अचानक तांत्रिक बिघाड झाला आणि इंजिनमधून धूर निघू लागला. क्षणार्धात आगीने भीषण रूप धारण केले. आगीची तीव्रता इतकी प्रचंड होती की, काही वेळातच टँकरच्या डिझेल टाकीचा मोठा स्फोट झाला. या स्फोटाचा आवाज दूरपर्यंत ऐकू आल्याने परिसरातील नागरिकांमध्ये मोठी घबराट पसरली. आगीच्या ज्वाळा आणि धुराचे लोट आकाशात उंचपर्यंत दिसत होते. या घटनेमुळे महामार्गावरील दोन्ही बाजूची वाहतूक काही काळासाठी पूर्णतः ठप्प झाली होती. टँकरला आग



लागल्याचे लक्षात येताच चालक वृंदावन सिंग व सहचालक नरसिंग कुशवा यांनी विलंब न लावता टँकर रस्त्याच्या कडेला थांबवला आणि तात्काळ बाहेर उड्या घेतल्या. त्यांच्या या सतर्कतेमुळे या भीषण आगीतून दोघेही सुखरूप बचावले. मात्र, या आगीत टँकर जळून पूर्णतः खाक झाला असून मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.घटनेची माहिती मिळताच विसरवाडी पोलीस ठाण्याचे कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रयत्न केले आणि रस्त्यावरील वाहनांची गर्दी हटवून वाहतूक पूर्ववत केली. सुदैवाने रसायनाचा टँकर असूनही वेळीच उपाययोजना केल्याने मोठा अनर्थ टळला.

# ठाणे महापालिका निवडणुकीत युतीला भाजपचा विरोध

दैनिक वादळ वार्ता
**ठाणे | प्रतिनिधी**

ठाणे महापालिका निवडणूक महायुतीत लढण्याची घोषणा शिवसेना ( शिंदे गट) आणि भाजपच्या नेत्यांनी जाहीर केली असली तरी ठाण्यात भाजप कार्यकर्त्यांमधून युती विरोधात विरोध दिसू लागला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कोपरी मतदार संघातील भाजप पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषद घेऊन विरोध दर्शविला असून स्वबळावर लढण्याचा आग्रह धरला आहे. परिणामी भाजपच्या स्थानिक नेत्यांसमोर बंड थोपविण्याचे मोठे आव्हान असणार आहे. मागील काही महिन्यांपासून ठाण्यात शिंदे शिवसेना आणि भाजप यांच्यात राजकीय संघर्ष सुरू होता. त्यामुळे आगामी महापालिका निवडणुकीत कार्यकर्त्यांनी थेट स्वबळाचा नारा देत दोन्ही पक्षांनी पदाधिकाऱ्यांना तयारीला लागण्याचे संकेत दिले होते. यामुळे अनेक नवे तसेच जुने इच्छुक पदाधिकाऱ्यांची मोर्चे बांधणी सुरु होती.ठाण्यासह राज्यातील इतर महापालिकांच्या निवडणुका महायुतीतच लढवण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. मंगळवारी ठाण्यात झालेल्या शिंदे सेनेच्या मेळाव्यात महायुतीचा नारा देण्यात आला होता. ठाण्यातील भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून युतीला तीव्र विरोध होऊ लागला आहे. भाजप ठाण्यात स्वबळावर निवडणूक लढवण्यास पूर्णतः सक्षम आहे, असा ठाम दावा भाजप पदाधिकाऱ्यांनी यावेळी केला आहे.

संपादकीय

# नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थ व्यवस्थेला बळ

समुद्रकिनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे.जगामध्ये जवळजवळ ९३ देश नारळाचे उत्पादन घेतात. आपल्या महाराष्ट्र राज्यात नारळ उत्पादनाचा विचार करता राज्यात ३३ हजार हेक्टरवर नारळाचे लागवडीखाली क्षेत्र असून १७ हजार ९२९ हेक्टर सर्वाधिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे, तर कोकणात दरवर्षी अंदाजे नारळाचे रुपये १८.६३ कोटींचे उत्पादन होत असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुपये १ हजार ४५७ लाख नारळाचे उत्पादन होत असते. ही माहिती प्रादेशिक नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. किरण मालशे यांनी २०२३ साली दिली होती. म्हणजे अजून चांगल्या प्रकारे नारळाची लागवड केल्यास नारळाच्या उत्पादनात वाढ होऊन कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल.आज नारळाचा विचार केल्यास नारळाच्या उत्पादनात घट होऊन नारळाच्या किमती जवळजवळ तिप्पट झालेल्या दिसत आहेत. तर नारळाच्या तेलाची किंमत रुपये ६०० प्रति लिटर झाली आहे. याला कारण रोगराई, बदलते हवामान, अपुरे पाणी आणि माकडांचा वावर होय. असे असले तरी कोकणात चांगले नारळाचे उत्पादन होते. तेव्हा नारळ उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिल्यास उत्तम प्रकारे बळ कोकणच्या अर्थव्यवस्थेला मिळू शकते. त्यासाठी योग्य प्रकारे नारळाची लागवड करायला हवी. म्हणजे नारळाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे कोकणच्या उत्पन्नात अधिक चांगल्याप्रकारे वाढ होऊ शकते. तेव्हा नारळ कितीही महाग झाला तरी कोकणी माणूस खोबऱ्याशिवाय जेवण करीत नाही. नारळाचा विचार केल्यास अनेक लोकांचा संसार नारळाच्या व्यवसायावर अवलंबून असतो. सध्यातरी हा व्यवसाय कोकणात शेतकऱ्यांचा पूरक जोडधंदा म्हणून ओळखला जातो. काही शेतकरी शेतीच्या बाजूने नारळाची रोपे लावतात. काहींची तर नारळाची स्वतंत्र बाग आहे. एक माड जरी असला तरी त्याचा अनेक प्रकारे उपयोग होऊ शकतो. तेव्हा नारळाच्या व्यवसायामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नारळाची अधिक प्रमाणात लागवड करणे गरजेचे आहे. आपण नारळ जरी म्हणालो असलो तरी त्याच्या विविध भागांचा उपयोग नागरिकांच्या उपयोगासाठी होत असतो. त्यामुळे नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. असे आपण प्राथमिक शाळेत शिकलो आहोत. तेव्हा नारळाच्या झाडाचे योग्य प्रकारे संगोपन आपल्याला करावे लागेल. कारण त्याच्या प्रत्येक भागाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. आता आपण नारळाच्या झाडांच्या विविध भागांचा उपयोग कसा केला जातो किंवा नागरिकांना होतो याविषयी माहिती घेऊ. त्यामुळे नारळाच्या झाडाला खऱ्या अर्थाने कल्पवृक्ष म्हणतात हे वाचक वर्गाच्या लक्षात येईल.घाटमाथ्यावर आवडीने शेंगदाणे जेवणात वापरतात त्याप्रमाणे कोकणात ओल्या खोबऱ्याचा जेवणात वापर केला जातो. कोवळ्या नारळाचे पाणी लोक आवडीने पितात. कोकणात त्याला शहाळे असेही म्हणतात. खोबऱ्यापासून तेल व दुधसुद्धा तयार करतात. तेल काढल्याने सुखी पेंडसुद्धा मिळते. करवंटीचा वापर डवली व कोळशासाठी केला जातो. नारळ सोलल्यानंतर त्यांची सोडणा मिळतात ती पाण्यात फुगत घातली जातात. त्यानंतर त्याचा काथ्या तयार केला जातो. त्यापासून दोरी, ब्रश, जाळी, चटई इत्यादी वस्तू तयार केले जातात. नारळाच्या पानापासून सुंदर छप्पर किंवा जाळी बनवली जातात. त्याच्या हिरापासून झाडू बनवितात. हिराच्या झाडूलासुद्धा बाजार पेठेत बऱ्यापैकी मागणी असते. नारळाचे जे खोड असते त्यापासून घरासाठी वासे तयार केले जात असून आकर्षक फर्निचरसुद्धा तयार करतात. कोकणात खाडीशेजारी जी बैठी घरे आहेत त्यांना सर्रास माडाचे वासे दिसतील. खारी हवा असल्यामुळे वासेसुद्धा जास्त दिवस टिकतात. तेव्हा नारळाचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी उपयुक्त शेतीला जोडधंदा आहे. तसेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे असे म्हणावे लागेल.कोकणात नदी–नाल्यांच्या कडेला, खाडी व समुद्राच्या काठावर डोलणारी नारळाची झाडे दिसतील तशी त्याची काळजीसुद्धा घेतली जाते. विशेष म्हणजे खारी हवा नारळाला पोषक असते. समुद्र किंवा खाडीच्या कडेला जी नारळाची झाडे डोलताना पाहिल्यावर कल्पना येते. तेव्हा सध्याच्या काळात नारळाची किंमत विचारात घेता नारळाची लागवड करणे फायदेशीर ठरणार आहे. नारळाच्या बटू व उंच जातीचा विचार केल्यास बटू जात ३ ते ५ वर्षांत, तर उंच जाती ५ वर्षांनंतर नारळ धरायला लागतात. बटू नारळाला कमी, तर उंच नारळाला जास्त आयुष्य असते. माडाला नारळ लागल्यावर जवळजवळ ९ महिन्यांत नारळ परिपक्व होतात. मात्र त्या आधी सुद्धा नारळ काढू शकतो. जमीन, योग्य खत, पाणी आणि माडाची काळजी घेतल्यास नारळाचे उत्पादन वाढण्याला मदत होते. आज जे शेतकरी संकटात आहेत त्यांनी नारळाची लागवड बिनधास्तपणे करावी. आजच्या घडीला कोकणात शेतकऱ्यांसाठी उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे.समुद्र किनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे. त्यासाठी केवळ घरापुरते नारळाचे उत्पादन न करता व्यावसायिक दृष्टिकोनातून नारळाच्या उत्पादनाकडे कोकणवासीयांनी पाहावे. तसेच शासन स्तरावर नुकसानग्रस्त नारळ बागायतदारांना योग्य सुरक्षा विमा कवच आणि नारळ प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन वेळीच दिले गेले पाहिजे. त्यामुळे नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल हे मात्र निश्चित.

# भारतीय जनता मजदूर संघाचे राष्ट्रव्यापी पत्र व निवेदन अभियान ३१ डिसेंबर २०२५ रोजी देशभरात आयोजन

## महिलांच्या न्याय हक्का साठी आंदोलन–शांत प्रकाशजी जाटव

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

भारतीय जनता मजदूर संघ यांच्या वतीने दि.३१ डिसेंबर २०२५ रोजी देशभरात राष्ट्रव्यापी पत्र व निवेदन अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानाचे नेतृत्व संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शांत प्रकाशजी जाटव हे करीत आहेत.या अभियानाचा मुख्य उद्देश देशातील अंगणवाडी सेविका, आशा व आशा कार्यकर्ती या महिला कार्यकर्त्यांना त्यांच्या नियमित,वेळेत व लक्ष्य आधारित कामाच्या स्वरूपानुसार श्रमिक म्हणून वैधानिक ओळख मिळावी,योग्य मानधन तसेच सामाजिक सुरक्षा उपलब्ध करून देण्या बाबत भारत सरकारचे लक्ष वेधणे हा आहे.



संघटनेने स्पष्ट केले आहे की,अंगणवाडी व आशा कार्यकर्त्यी कडून सातत्याने नियमित स्वरूपाचे काम करून घेतले जाते व त्यांना मानधन दिले जाते. माननीय सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्णयांनुसार, कामाच्या मोबदल्यात पारिश्रमिक मिळणारी व्यक्ती ही श्रमिकांच्या श्रेणीत मोडते.असे असतानाही आजही या कार्यकर्त्यांना श्रमिकदर्जा, सामाजिक सुरक्षा,आरोग्य विमा यांसारख्या मूलभूत सुविधा मिळत नसल्याचे वास्तव आहे.

**अभियानाची कार्यपद्धती**

या अभियानांतर्गत केंद्रीय स्तरावर पत्र मोहीम राबविण्यात येणार असून, संघटनेने तयार केलेल्या समान पत्र प्रारूपावर कार्यकर्ते आपली स्वाक्षरी करून नाव,पत्ता व मोबाईल क्रमांक नमूद करतील व ते पत्र स्पीड पोस्ट अथवा टपालाद्वारे पंतप्रधान तसेच संबंधित केंद्रीय मंत्र्यांना पाठविण्यात येईल.त्याच बरोबर जिल्हा स्तरावर कार्यकर्ते समूहबद्ध होऊन जिल्हाधिकाऱ्यांना शांततापूर्ण व मर्यादित पद्धतीने निवेदन सादर करणार आहेत.

**पदाधिकाऱ्यांची भूमिका**

सर्व पदाधिकाऱ्यांनी अभियानाची माहिती वेळेत प्रत्येक कार्यकर्त्यां पर्यंत पोहोचवणे, अभियानाचे उद्दिष्ट स्पष्ट व तथ्यात्मक स्वरूपात समजावून सांगणे तसेच संपूर्ण अभियानादरम्यान शिस्त,मर्यादा व संघटनेची शिस्त कायम राखणे आवश्यक असल्याचे संघटनेने आवर्जून नमूद केले आहे.

या अभियानात देशातील सुमारे २७ लाख अंगणवाडी व आशा कार्यकर्त्यांचा सहभाग अपेक्षित असून,याव्यापक सहभागामुळे राष्ट्रीय पातळीवर सकारात्मक संवाद व धोरणात्मक विचारमंथनास चालना मिळेल,असा विश्वास भारतीय जनता मजदूर संघाने व्यक्त केला आहे.

या अभियानात सर्व अंगणवाडी कार्यकर्त्या, सेवीका,आशा स्वयं सेवीका यांनी सहभागी होऊन पत्रव्यवहार करून जिल्हा व तालुका स्तरावर दि.३१ डिसेंबर रोजी निवेदन देण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता मजदुर संघाचे राष्ट्रीय सचिव भाऊसाहेब घोडके भ्रमणध्वनी क्रमांक (९०२१२४३५३५), महाराष्ट्र राज्य सचिव धनंजय कुलकर्णी,(९८२२०९६९७९) मराठवाडा सचिव चंद्रकांत पाटील (९३२५७०५४५८)यांनी या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# चिंचोलीमाळी येथील रोहन गलांडे यांच्या आमरण उपोषणाचा पाचवा दिवस; प्रकृती चिंताजनक,प्रशासन सुस्त

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

चिंचोली माळी ता.केज येथे विविध प्रलंबित नागरी व शासकीय मागण्यांच्या पूर्ततेसाठी रोहन गलांडे यांनी बेमुदत आमरण उपोषणास सुरुवात केली आहे. बुधवार दि.१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ७–३० वाजता संत नामदेव महाराज मंदिर येथे ते उपोषणास बसले आहेत. परंतु केज तहसीलदार राकेश गिड्डे,गटविकास अधिकारी नागरगोजे, माध्यमिक शिक्षण मंडळ अधिकारी प्रिया राणी पाटील,सार्वजनिक बांधकाम विभाग घोळवे, कृषी अधिकारी पठाडे, पोलिस निरीक्षक स्वप्निल उनवने यांनी रोहन गलांडे पाटील यांना जिवे मारायच ठरवले आहे असे चिन्ह दिसत आहेत कारण अमरण उपोषणाचा पाचवा दिवस आहे रोहन गलांडे पाटील यांची प्रकृती चिंताजनक झाली आहे त्यांना बोलताना छातीवर दाब येत आहे, डोकेदुखी उमघाम होत आहे,छातीत दुखायला सुरुवात झाली आहे,अंग थरथरत आहे एवढ्या वेदना होत



असताना प्रशासनाला काही घेणे देणे नाही असे रोहन गलांडे पाटील यांनी म्हटले आहे. मेलो तरी चालेल पण मागण्या मान्य झाल्याशिवाय अमरण उपोषण मागे घेणार नाही.या विषयी सविस्तर वृत्त असे की,चिंचोली माळी येथील उर्वरित अतिक्रमण तात्काळ हटवून छत्रपती संभाजी महाराज चौक (नागबेट वस्ती) ते संत नामदेव महाराज मंदिरा पर्यंत रस्ता व नालीचे काम त्वरित सुरू करण्यात यावे,अशी प्रमुख मागणी त्यांनी केली आहे.तसेच केज तालुक्यातील विहीर, गायगोठा व घरकुल योजनेचे प्रलंबित हप्ते तात्काळ लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावेत,अशी मागणीही उपोषणातून करण्यात आली आहे.यासोबतच चिंचोली माळी ग्राम पंचायत हद्दीतील नामदेव महाराज परिसरातील अतिक्रमण हटविणे, येथील कर्मवीर विद्यालयाच्या २००५ ते २०२५ या कालावधीतील निवेदना वरील मागण्यांची चौकशी करून कार्यवाही करणे, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या व नव्या इमारतींच्या बांधकाम व पुनर्विकासासाठी २०१५ ते २०२५ या कालावधीत प्राप्त व खर्च झालेल्या निधीची माहिती देऊन चौकशी करणे, महाडीबीटी अनुदानाचे प्रलंबित लाभ शेतकऱ्यांना तात्काळ देणे,गायरान परिसरातील सौरऊर्जा प्रकल्पाचे काम तातडीने सुरू करणे आदी मागण्या करण्यात आल्या आहेत.दि.११ डिसेंबर २०२५ रोजी तहसीलदार यांना निवेदनाद्वारे सादर केलेल्या सर्व मागण्या मान्य करण्यात याव्यात, तसेच चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम तातडीने सुरू करण्यात यावे,या मागण्यांसाठीच हे आमरण उपोषण सुरू करण्यात आल्याचे रोहन गलांडे यांनी सांगितले आहे.मागण्या मान्य होई पर्यंत उपोषण सुरूच राहील,असा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

# केसांना तेल लावण्याची योग्य वेळ कोणती?

केसांना तेल लावणे ही बर्याच भारतीय घरांमध्ये जुनी प्रथा आहे. नारळ आणि बदाम असो किंवा एरंडेल आणि कांद्याचे तेल असो, लोक टाळूला हायड्रेट करण्यासाठी आणि निरोगी केसांच्या वाढीस चालना देण्यासाठी तेलांवर अवलंबून असतात. पण याबद्दल नेहमीच एक प्रश्न असतो की तुम्ही सकाळी किंवा रात्री तुमच्या केसांवर तेल लावता का? ते दोघेही बर् यापैकी फायदेशीर असू शकतात आणि त्यांचा योग्य वेळ सामान्यत: जीवनशैली, केसांचा प्रकार आणि केसांच्या गरजांनुसार कंडिशन्ड केला जाऊ शकतो. केसांची वाढ थांबण्यामागे अनेक शारीरिक आणि बाह्य कारणे असू शकतात. सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे पोषक तत्वांची कमतरता. जर तुमच्या आहारात लोह, प्रथिने, बायोटिन आणि जीवनसत्त्वे (A, C, D, E) यांची कमतरता असेल, तर केसांच्या मुळांना पुरेसे पोषण मिळत नाही, ज्यामुळे वाढ खुंटते.दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे अनुवांशिकता आणि वाढते वय, ज्यामुळे केसांची नैसर्गिक वाढण्याची गती कमी होते. मानसिक आणि शारीरिक ताण हे देखील केसांच्या वाढीवर नकारात्मक परिणाम करते. अति ताणामुळे केस 'रेस्टिंग फेज' मध्ये जातात आणि त्यांची वाढ थांबते. याव्यतिरिक्त, संप्रेरकांचे असंतुलन, जसे की थायरॉईडच्या समस्या किंवा महिलांमधील पीसीओएस, यामुळेही केसांची वाढ प्रभावित होते. केसांवर वारंवार रासायनिक प्रक्रिया करणे, अति उष्णतेचा वापर आणि टाळूची अस्वच्छता यामुळे केसांची छिद्रे बंद होतात. यामुळे नवीन केस येत नाहीत आणि असलेल्या केसांची वाढ थांबते.



केसांना तेल लावल्याने डोक्यात रक्त प्रवाह वाढतो, होतो आणि तुटणे थांबते. तेले केसांना आवश्यक फॅटी ऍसिड आणि जीवनसत्त्वे देखील आहार देतात किंवा प्रदान करतात, ज्यामुळे निरोगी वातावरण वाढते. नियमित तेल लावल्याने फ्रिझ देखील नियंत्रित होऊ शकते, जे दीर्घकाळापर्यंत केसांचा पोत वाढवू शकते तसेच केस गळणे कमी करू शकते. ज्यांना द्रुत मालिश करायची आहे आणि नंतर केस धुवायचे आहेत त्यांच्यासाठी सकाळी लवकर आपल्या केसांना तेल लावण्याची कल्पना ही एक चांगली प्रथा असू शकते. केस वाढण्यासाठी, रात्रीच्या वेळी तेल लावणे चांगले आहे कारण तेल डोक्यावर जास्त काळ राहते, ज्यामुळे अधिक पोषण मिळते. झोपेमुळे पेशी विकसित आणि दुरुस्त करण्यासाठी देखील ओळखले जाते आणि यामुळे निरोगी केसांच्या आरोग्य सुधारू शकते. तथापि, वेळ सुसंगततेइतकी महत्त्वाची नाही. जरी सकाळी तेल लावणे सोपे आणि नियमितता राखण्याची अधिक शक्यता असेल, तरीही ते चांगले परिणाम देखील देऊ शकते. त्रीचे तेल लावणे खोल पोषण आणि केसांच्या वाढीसाठी योग्य असेल आणि व्यस्त वेळापत्रक असलेल्या लोकांसाठी सकाळी तेल लावणे अधिक योग्य आहे. यात आपल्या टाळूच्या प्रकार आणि जीवनशैलीसाठी सर्वात योग्य वेळ निवडणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे सुसंगत असणे समाविष्ट आहे. हे केवळ घड्याळच नाही जे केसांना निरोगी वाढवते, परंतु नियमित काळजी घेते

**सकाळी तेल लावण्याचे फायदे**

शैम्पू करण्यापूर्वी घाण सैल करण्यास आणि उत्पादने तयार करण्यास मदत करते.
डोके थंड होते आणि रक्ताभिसरण वाढवते .
जर आपल्याला आपल्या केसांमध्ये तेल घालून झोपायला आवडत नसेल तर परिपूर्ण.
सकाळच्या तेलाच्या कमतरते
सकाळी तेल लावण्याचे नुकसान.
टाळूमध्ये तेल शिरण्यासाठी अपुरा वेळ असतो.
चिकट केसांसह वेळ घालवण्यामुळे धूळ आणि प्रदूषण होऊ शकते.
जेव्हा आपण तेल लावता आणि शैम्पूचा वापर करत नाही तेव्हा योग्य नाही.
जेव्हा आपण ३० मिनिटे ते २ तासांत आपले केस धुण्याचा विचार करता तेव्हा आपण सकाळी तेल लावणे चांगले.
रात्री तेल लावण्याचे फायदे.
रात्रीच्या वेळी तेल लावणे अधिक प्रभावी मानले जाण्याची शक्यता आहे.
टाळूमध्ये तेल शोषून घेण्यासाठी अधिक वेळ असतो.
शरीराच्या पुनर्विकासास आणि पुनरुत्पादनास मदत करा.
औषधी वनस्पती कोमल मालिशसह तणाव कमी करण्यास मदत करू शकतात.
टाळूचे हायड्रेशन आणि केसांची मजबुती वाढवते.
रात्री तेल लावण्याचे नुकसान.
उशी तेलकट आहे आणि काहींना अस्वस्थ करते.
जास्त प्रमाणात तेल वापरल्याने ते बंद होऊ शकते.
तेलकट किंवा मुरुम–प्रवण टाळूसाठी योग्य नाही.
स्वत: ला स्वच्छ ठेवण्यासाठी आपल्या उशीवर हलके तेल आणि टॉवेल वापरला पाहिजे.

# पतसंस्थां व बँकांनी स्वदेशीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे–अनंतकुमार मिश्रा

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

विणकर कारागिरांनी वस्त्रोद्योग निर्मितीत सुबक व आकर्षक पद्धतीने काम करून चांगला नावलौकिक मिळविला आहे.बनारसी साडी, कांजीवरम साडी या सुंदर कारागिरी व कलाकुसरीमूळे जगभर प्रसिद्ध आहेत.देशातील सरकार स्वदेशीचा व्यवसाय करणाऱ्या स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देत आहे.सहकार क्षेत्राच्या चळवळीमुळे महाराष्ट्राची प्रगती होत आहे.सहकाराच्या माध्यमातून मोठ्या पतसंस्थांचे जाळे निर्माण झाले आहे. पतसंस्थांच्या माध्यमातून लघुउद्योगांना आर्थिक सहाय्य उपलब्ध होते.पतसंस्थांनी व बँकांनी स्वदेशीचा व्यवसाय करणाऱ्या व्यवसायिकांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करून द्यावे व प्रोत्साहन द्यावे.असे प्रतिपादन सहकार भारतीचे राष्ट्रीय संयोजक अनंत कुमार मिश्रा यांनी केले आहे.


सहकार भारतीचे राष्ट्रीय संयोजक अनंत कुमार मिश्रा यांनी पंडित दीनदयाळ पतसंस्थेला सदिच्छा भेट दिली असता त्यांचा सत्कार पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा यांच्या हस्ते करण्यात आला.तसेच जैन ओसवाल नागरी पतसंस्थेचे नवनिर्वाचित चेअरमन अभय पितळे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्रमुख उपस्थितीत पंडित दीनदयाळ नागरी पतसंस्थेचे ज्येष्ठ संचालक मिलिंद गंधे,संचालक अनंत होशिंग,बाबासाहेब साठे,संतोष गांधी,मर्चंट बँकेचे संचालक किशोर गांधी,पद्मशाली समाजाचे अध्यक्ष संजय वल्लाकट्टी,उद्योजक विनोद गुंडू,उमेश मेरगु,सोलापूर सहकार भारतीचे सह संघटक सूर्यकांत पाटील,देवेंद्र यादव,पंढरपूरचे महामंत्री शिवानंद बोरमणी,हरियाली चे सुरेश खामकर,उज्वला भांगे,ज्ञानेश्वर भांगे,दीपक रोहोकले, अजिंक्य गुरावे,व्यवस्थापक निलेश लाटे, उपव्यवस्थापक सुखदेव दरेकर आदी उपस्थित होते.वसंत लोढा म्हणाले,स्वदेशीचा स्वीकार करून स्थानिक कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी पतसंस्थांच्या माध्यमातून आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देऊ.जे व्यवसायिक स्वदेशीचा व्यवसाय करतील त्या व्यवसायिकांना पतसंस्थांच्या माध्यमातून सहज व सोप्या पद्धतीने कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल.यावेळी उपस्थितांचे आभार मिलिंद गंधे यांनी मानले.

## महानगरपालिका निवडणुकीसाठी मनसे सज्ज; ३५ इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती

# नगरचा विकास आणि स्वच्छ प्रशासनासाठी मनसेची ताकद पणाला लावणार-गजेंद्र राशीनकर

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मोठ्या ताकदीने उतरण्याचा निर्धार केला असून, त्या अनुषंगाने आज मनसेच्या वतीने उमेदवारांच्या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. या मुलाखती प्रक्रियेत नगर शहरातील तब्बल ३५ इच्छुक उमेदवारांनी सहभाग नोंदविला. संघटनात्मक ताकद, स्थानिक प्रश्नांची जाण, जनसंपर्क आणि पक्षनिष्ठा या निकषांवर उमेदवारांची चाचपणी करण्यात आली. या वेळी जिल्हा अध्यक्ष सचिन डफळ, शहर अध्यक्ष गजेंद्र राशिनकर, शहर सचिव डॉ. संतोष साळवे, विद्यार्थी सेनेचे उपाध्यक्ष सुमित वर्मा, विद्यार्थी सेना जिल्हाध्यक्ष प्रकाश गायकवाड, जिल्हा उपाध्यक्ष मनोज राऊत, आरती उफाडे, शहर उपाध्यक्ष संदिप चौधरी, संकेत व्यवहारे व तुषार हिरवे, विभाग अध्यक्ष प्रशांत जाधव, प्रविण गायकवाड तसेच अंबरनाथ भालसिंग आदी प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.





या प्रसंगी शहर अध्यक्ष गजेंद्र राशिनकर यांनी मनसेची आगामी निवडणूक रणनीती स्पष्ट करत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, महानगरपालिकेतील भ्रष्टाचार, ढिसाळ प्रशासन आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे होत असलेले दुर्लक्ष आता सहन केले जाणार नाही. मनसे नगर शहरात सक्षम, प्रामाणिक आणि जनतेशी थेट जोडलेले उमेदवार देणार असून, ही निवडणूक जनतेच्या प्रश्नांवर लढवली जाईल. नगर शहराचा सर्वांगीण विकास, पारदर्शक कारभार आणि नागरिकांना न्याय देणारे प्रशासन हे मनसेचे मुख्य उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

राशिनकर यांनी आगामी दोन महत्त्वाच्या कार्यक्रमांची घोषणा करत संघटना अधिक मजबूत करण्यावर भर दिला. पहिल्या टप्प्यात नगर शहरातील सर्व प्रभागांमध्ये व्यापक जनसंवाद दौरा राबविण्यात येणार असून, या दौऱ्यात मनसेचे पदाधिकारी व कार्यकर्ते थेट नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या जाणून घेणार आहेत. दुसऱ्या टप्प्यात शहरस्तरीय कार्यकर्ता मेळावा व प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येणार असून, त्यामध्ये निवडणूक नियोजन, प्रभागनिहाय बांधणी, बूथ व्यवस्थापन आणि प्रभावी प्रचार याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. संघटन मजबूत असेल तरच विजय निश्चित आहे, असे त्यांनी ठामपणे नमूद केले.मुलाखतीदरम्यान इच्छुक उमेदवारांनी आपल्या-आपल्या प्रभागातील समस्या, विकासाचा आराखडा आणि पक्षासाठी काम करण्याची तयारी मांडली. अनेक नव्या चेहऱ्यांसह अनुभवी कार्यकर्त्यांनीही मुलाखती दिल्याने यावेळी मनसेकडे सक्षम आणि लढाऊ उमेदवारांची मोठी फळी तयार होत असल्याचे दिसून आले. जिल्हा अध्यक्ष सचिन डफळ यांनी योग्य, स्वच्छ प्रतिमेच्या आणि जनतेशी जोडलेल्या उमेदवारांनाच संधी देण्यात येईल, असे स्पष्ट केले.एकूणच, या मुलाखतींच्या माध्यमातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तयारीला वेग दिला असून, नगर शहरात मनसे निर्णायक ताकद म्हणून उभी राहत असल्याचे स्पष्ट झाले आहे. आगामी काळात आंदोलन, जनसंवाद आणि संघटनात्मक कार्यक्रम अधिक तीव्र होणार असून, नगरच्या राजकारणात मनसे महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# शिवसेनेतून निवडणूक लढवण्या साठी महिला इच्छुकांची विक्रमी गर्दी

## महापालिकेच्या २२७ वॉर्डसाठी २७०० हून अधिक इच्छुकांनी दिल्या मुलाखती

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या कामांमुळे इच्छुकांना विजयाचा विश्वास

दैनिक वादळ वार्ता
मुंबई । प्रतिनिधी

मुंबई महापालिका निवडणूक जाहीर झाल्यानंतर शिवसेनेतून निवडणूक लढवण्यासाठी हजारो इच्छुकांनी गर्दी केली आहे. शिवसेनेकडून आज इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यात २४०० हून अधिक इच्छुकांनी मुलाखत दिल्याची माहिती शिवसेना नेते व माजी खासदार राहुल शेवाळे यांनी दिली. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी शिवसेना सचिव संजय मोरे, शिवसेना उपनेत्या व प्रवक्त्या शीतल म्हात्रे उपस्थित होत्या.उपनेते राहूल शेवाळे म्हणाले की,महापालिका निवडणुकीत शिवसेना पक्षाकडून उमेदवारी मिळावी यासाठी हजारो इच्छुक आहेत. पालिका निवडणूक शिवसेना महायुती म्हणूनच लढणार आहे मात्र निवडणुकीत योग्य उमेदवार असावा यासाठी पक्षाकडून आज रंगशारदा येथे मुलाखत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुंबईतील लोकसभा मतदार संघनिहाय इच्छुकांच्या मुलाखती घेण्यात आल्या. पक्षाकडून प्रत्येक लोकसभा क्षेत्रासाठी तीन निरीक्षकांची यासाठी नियुक्ती करण्यात आल्याचे शेवाळे म्हणाले. मुंबईत सर्व पक्षांनी इच्छुकांच्या मुलाखती घेतल्या पण कोणालाही इतका प्रचंड प्रतिसाद मिळाला नाही जो शिवसेनेला मिळाला असे शेवाळे म्हणाले. २२७ वॉर्डसाठी २४०० हून अधिक जणांनी मुलाखत दिली आहे. यात मनसे, राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षातील पदाधिकाऱ्यांनी सुद्धा आज शिवसेना पक्षासाठी मुलाखती दिल्याचे ते म्हणाले. अडीच वर्ष मुख्यमंत्री असताना एकनाथ शिंदे यांनी राज्यात आणि मुंबईत केलेल्या विकास कामांनी एक प्रभावी छाप पाडली आहे. त्यामुळे शिवसेनेला विजयाची खात्री आहे. उपमुख्यमंत्री शिंदे यांचा जनमानसात प्रभाव असल्याने शिवसेनेला इच्छुकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे.



# महेंद्रशेठ घरत यांच्यातर्फे सिद्धार्थ दासला सव्वा लाखाची सायकल

दैनिक वादळ वार्ता
उलवे । प्रतिनिधी

सिद्धार्थ संतोष दास हा रेडक्लिप शाळेत बारावीमध्ये शिकत आहे. त्याने बॅकवर्ड रोप स्किपिंग या क्रीडा प्रकारात गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचे एकूण पाच जागतिक विक्रम प्रस्थापित केले आहेत. त्याबद्दल आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी सिद्धार्थचे अभिनंदन केले आणि 'सुखकर्ता'वर सत्कार केला. आता त्याला सायकलिंगमध्येही पुढे जायचे आहे. त्यामुळे उच्च दर्जाची सव्वा लाखाची रेसिंग सायकल महेंद्रशेठ घरत यांनी सिद्धार्थ दासला नुकतीच भेट दिली.

सिद्धार्थ दासने ३० सेकंदांत १५१ स्किप्स पूर्ण करत नवा जागतिक विक्रम केला आहे. एका मिनिटात सर्वाधिक बॅकवर्ड स्किप्स, तीन मिनिटात सर्वाधिक बॅकवर्ड स्किप्स, ३० सेकंदात डोळे झाकून एकाच पायावर सर्वाधिक बॅकवर्ड स्किप्स, ३० सेकंदात एकाच पायावर सर्वाधिक बॅकवर्ड स्किप्स असे नवनवीन विक्रम केले आहेत. येत्या काळात त्याने सायकलिंगमध्ये पुढे जायचा मनोदय व्यक्त करताच, त्याची गुणवत्ता पाहून महेंद्रशेठ घरत यांनी उच्च दर्जाची सव्वा लाखाची रेसिंग सायकल सिद्धार्थ दासला भेट म्हणून दिली आहे. त्याबद्दल सिद्धार्थ आणि त्याच्या आई-वडिलांनी महेंद्रशेठ घरत यांचे आभार मानले. यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेतर्फे आजपर्यंत अनेक गरीब विद्यार्थ्यांची फी भरली आहे. अनेकांना उच्च शिक्षणासाठी, परदेशी शिक्षणासाठी मदत केली आहे. अनेकांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी खंबीरपणे साथ दिली आहे. त्यामुळे अनेक तरुणांचे आयुष्य उजळले आहे. सिद्धार्थ हा मेहनती तरुण आहे. आई-वडिलांची त्याला उत्तम साथ आहे. त्याच्यातील आत्मविश्वास आणि त्याचे ध्येय यामुळे येत्या काळात तो आणखी नवनवीन विक्रम प्रस्थापित करून देशाचे नाव मोठे करील, असा मला विश्वास आहे. त्यामुळे त्याला यापुढेही माझे सहकार्य कायम राहील.यावेळी सिद्धार्थ म्हणाला, आई-वडील आणि महेंद्रशेठ घरत साहेबांनी मला वेळोवेळी प्रोत्साहन दिले आहे. त्यांचा हात माझ्या पाठीवर आहे. त्यामुळे देशाचे नाव मोठे करण्यासाठी मी कठोर मेहनत आणि प्रामाणिकपणे प्रयत्न करेन. महेंद्रशेठ घरत साहेबांनी मला उच्च क्लालिटीची रेसिंग सायकल दिली आहे. त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहे.



# उरण तालुका विज्ञान प्रदर्शनात प्रश्नमंजुषा स्पर्धेत रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर विद्यालय फुंडे येथील हर्ष ठाकूर प्रथम




दैनिक वादळ वार्ता
उरण । प्रतिनीधी

उरण तालुक्यातील पिरकोन येथे आयोजित उरण तालुका विज्ञान प्रदर्शनांतर्गत इयत्ता ९ वी ते १२ वी विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेत जुनिअर कॉलेजचा विद्यार्थी हर्ष जगदीश ठाकूर (इ. ११ वी विज्ञान, तुकडी - ब) याने उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला आहे.या यशामुळे संबंधित विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे. हर्षच्या या यशामागे प्रा. अरुण देवरे, विज्ञान प्रदर्शन समिती सदस्य प्रा आरती मोरे, विज्ञान विभाग प्रमुख प्रा.माने सर, जुनिअर कॉलेज प्रमुख प्रा. पाटोळे सर व सर्व विज्ञान शिक्षक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.या उल्लेखनीय यशाबद्दल स्थानिक स्कूल कमिटीचे चेअरमन कृष्णाजी कडू, स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे, उपमुख्याध्यापिका संगीता थोरात,कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे,नवनीत ठाकूर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हर्ष ठाकूर व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करून त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# राज्यातील गंभीर प्रश्न गृहमंत्र्यांच्या दरबारात!

## सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळात खा.नीलेश लंके यांचा समावेश

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विविध गंभीर आणि संवेदनशील प्रश्न केंद्र सरकारच्या निदर्शनास आणण्यासाठी खा. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केंद्रीय गृहमंत्री मा. अमितभाई शाह यांची भेट घेतली. या भेटीत राज्यातील कायदा-सुव्यवस्था, प्रलंबित गुन्हे, सामाजिक न्याय तसेच आपत्तीग्रस्त नागरिकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली.खासदार नीलेश लंके यांचा या शिष्टमंडळात समावेश होता.मस्साजोग (जि. बीड) येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, अशी ठाम मागणी शिष्टमंडळातील खासदारांनी यावेळी केली. या प्रकरणामुळे ग्रामीण भागातील लोकप्रतिनिधींच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले.बीड जिल्ह्यातील स्व. महादेव मुंडे यांच्या खूनप्रकरणात तपासात होत असलेल्या दिरंगाईकडे लक्ष वेधत, मारेकऱ्यांना तातडीने अटक करून कायद्यानुसार कठोर शिक्षा द्यावी, अशी स्पष्ट भूमिका मांडण्यात आली.



फलटण येथे घडलेल्या स्व. डॉ. संपदा मुंडे यांच्या आत्महत्येप्रकरणी लवकरात लवकर तपास पूर्ण करून दोषींवर कठोर कारवाई करावी, तसेच त्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, अशी मागणी खासदार लंके यांनी केली.

**अतिवृष्टीग्रस्तांसाठी भरीव मदतीचा आग्रह**

महाराष्ट्रातील अतिवृष्टीग्रस्त नागरिकांची विदारक परिस्थिती मांडून, राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून राज्याला भरीव मदत मिळावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शेती, घरे आणि उपजीविकेचे मोठे नुकसान झाल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

**निवडणूक हिंसाचार व रोख रक्कम**

नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान झालेला हिंसाचार तसेच मोठ्या प्रमाणावर आढळलेल्या रोख रकमा लोकशाहीसाठी चिंताजनक असल्याचे नमूद करत, याबाबत कठोर आणि निर्णायक कारवाई करावी, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली.

# वीर वाजेकर महाविद्यालयाच्या कु.गौरव ठाकूर याची ऑल इंडिया आंतर विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेसाठी निवड




दैनिक वादळ वार्ता
उरण । प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय फुंडे उरण मधील कु. गौरव ठाकूर ची मुंबई विद्यापीठाअंतर्गत ऑल इंडिया आंतर विद्यापीठ २७ ते ३१ जानेवारी २०२६ दरम्यान स्वामी विवेकानंद सुभारती विद्यापीठ मीरूर, उत्तर प्रदेश येथे होणाऱ्या नेमबाजी स्पर्धेसाठी निवड मुंबई विद्यापीठामार्फत झाली आहे. हि निवड मुंबई विद्यापीठाअंतर्गत इंटरझोन एअर पिस्टल स्पर्धा दि. १२, १३ नोव्हेंबर २०२५ रोजी सी.एच.एम कॉलेज, उल्हासनगर यांच्या मार्फत अंबरनाथ राइफल अँड पिस्टल शूटिंग रेंज अंबरनाथ येथे पार पडल्या, या स्पर्धेत १० मीटर एअर पिस्टलमध्ये मुंबई सिटी झोन आणि महाविद्यालयाला द्वितीय क्रमांक मिळवून दिला.या यशाबद्दल कु. गौरव ठाकूर चे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य तथा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष पी.जे.पाटील, कॉलेज विकास समितीचे अध्यक्ष बाळाराम पाटील, सुधीर घरत,भावना घाणेकर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर ,सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक आणि जिमखाना प्रमुख देवेंद्र कांबळे व सर्व जिमखाना सदस्यांनी अभिनंदन केले आहे.गौरव ठाकूर यांच्यावर सर्वच स्तरातून शुभेच्छा व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# धारूर आगाराची धारूर मुंबई ही शयनयान नव्हे तर मनस्तापयान!

## ओबडधोबड रस्त्याने धावणाऱ्या जुन्या काळातील सर्व्हिस बस तरी बऱ्या होत्या

## अशा भंगार गाड्या चालवून धारूर आगाराची आणि परिवहन मंत्र्याची इज्जत वेशीला

**गौतम बचुटे । केज**

धारूर आगारातील बस खिळखिळ्या झालेल्या असून धारूर ते मुंबई अशी धावणारी शयनयान म्हणून गोंडस नावाच्या बसचे नाव बदलून नरक यान किंवा मनस्ताप यान ठेवायला हवे. कारण या बसची अवस्था एवढी भंगार आणि कोणतीही सुविधा नसणारी आहे. या बसने एकदा प्रवास केला की, २१ व्या शतकात राज्य परिवहन मंडळाची अवस्था आणि त्यातही बीड जिल्ह्यातील धारूर आगाराची दुरावस्था दिसते.केज आणि धारूर तालुक्यातील प्रवाशांची मदार असलेले दोन तालुक्यासाठी धारूर आगारातून धावणाऱ्या बसेची अवस्था अत्यंत वाईट झालेली आहे. धूर ऐकणाऱ्या गाड्या, रस्त्यात हमखास बंद पडणाऱ्या आणि वेळेवर न धावणाऱ्या गाड्या अशी अवस्था आहे. त्यामुळे आता प्रवाशांचा कल खाजगी प्रवासी वाहतुकीकडे वळत आहे. तसेच या एसटी बसच्या तुलनेत खाजगी बसचे भाडे कमी असून चांगल्या सुविधा पुरविल्या जातात.परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी वाढदिवसा निमित्त त्यांच्या नातवाला टेस्ला कार भेट दिली पण त्यांनी राज्यातील सामान्य प्रवाशांनी किमान शिव्या देऊ नयेत अशा तरी गाड्या हव्यात.

**तिकीट दीडपट पण गैरसोय पाचपट**

साधी आणि लालपरी गाडीच्या तुलनेत या शयन यान गाडीचे तिकिटं दर हा सुमारे दीडपट जास्त आहे पण दीडपट तिकीट देऊन खिशाला चाट देऊन या गाडीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मात्र पाचपट त्रास सहन करावा लागत आहे.

**वातानुकूलित गाडी नुसते नाव पण खिडक्यांना काच नाही**

या गाडीच्या खाकीच्या काचा बंद होत नाहीत. काही खिडक्यांना तर काच नसल्याने प्लस्टिकचे काच लावून थातुरामातुर सोय केलेली आहे. तसेच खिडक्यांना लॉक देखील नाहीत.



**या गाडीच्या असुविधा आणि प्रवाशांच्या तक्रारी असतील त्या संदर्भात आगारातील तांत्रिक विभागाला सूचना देऊन गाडीच्या दुरुस्ती संदर्भात कळविले जाईल. तसेच ही गाडी ग्रामीण भागातून जात असल्याने खराब रस्ते यामुळे गाडी खिळखिळी झालेली आहे.**
**–नवनाथ चौरे,आगार प्रमुख, धारूर आगार**

**पडदे तर रस्त्यावर पडलेल्या घाण साफ केलेल्या कपड्या पेक्षाही घाण**

खिडक्यांना लावलेले पडदे हे अत्यंत घाण आणि धुळीने माखलेलेले व कळकट आहेत.

**मोबाईल चार्जर आणि लाईट बंद**

गाडीतील सर्व मोबाईल चार्जरचे पोर्ट बंद आहेत. तसेच रीडिंग लाईट बंद आहेत.

**_या गाडीने प्रवास केल्यास उकिरड्यात बसल्याचा भास नव्हे तर प्रत्यक्षात अनुभूती**

या गाडीने रात्री प्रवास करून उतरताना मात्र आपण अशा एखाद्या उकिरड्यातून प्रवास केल्यासारखे किळसवाणे वाटते.

**भंगार गाड्यामुळे चालक वाचकाना प्रवाशांची शिव्यांची लाखोली**

या गाडीने प्रवास करणारे प्रवासी असुविधेमुळे चालक वाहकांना शिव्यांची लाखोली वाहत आहेत. मात्र आगार प्रमुख, तांत्रिक विभाग आणि परिवहन खाते याला जबाबदार आहे.

# कर्मयोगी गाडगेबाबांचे विचार घेऊन विद्यार्थ्यांनी कृतीशील व्हावे–डॉ.सौदागर

### भाऊसाहेब पाटील अध्यापक महाविद्यालयात संत गाडगेबाबा स्मृतीदिन साजरा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

संत गाडगेबाबांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत. विचारातून कृतिशीलता जपावी असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले ते शहरातील भाऊसाहेब पाटील अध्यापक(बी एड) महाविद्यालयात संत गाडगे महाराज जयंतीनिमित्त कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ हनुमंत सौदागर, प्रमुख पाहुणे सरस्वती महाविद्यालयातील प्रा डॉ हरिदास शिंदे हे विचारपीठावर उपस्थित होते. प्रा बलाढये यु बी ,प्रा कचरे जे एस ,प्रा लुंगारे एस आर,प्रा जगदाळे एम एच,प्रा चोले एन जे ,ग्रंथपाल संतोष साळवी सुजीत नाईकवाडे यांची होती यावेळी बोलतांना डॉ सौदागर म्हणाले संत गाडगेबाबा हे मानवतावादी संत होते जीवनभरात सेवेचा वसा घेऊन दिवसभर गावातील घाण साफ करून रात्री लोकांच्या डोक्यातील अंधश्रद्धेची घाण साफ करण्याचे



कार्य त्यांनी केले. समाजसेवा सर्वश्रेष्ठ असल्याचा विचार त्यांनी दिला. त्यांच्या विचारातून देश घडत आहे.असे मत व्यक्त केले.छात्रअध्यापक परशुराम कचरे,शेख राहील या विद्यार्थ्यांनी मत व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी अरविंद गायसमुद्रे,सतीश नेहरकर, यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# नियमित व्यायाम हीच खरी आरोग्याची गुंतवणूक–प्रा.बरकसे

### अभिनव इंग्लिश स्कूलच्या स्पोर्ट डे चे उदघाटन

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील कोल्हेर रोड परिसरातील अभिनव इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित ' क्रीडा सप्ताह' चे उद्घाटन जेष्ठ पत्रकार तथा रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रा . राजेंद्र बरकसे यांच्या हस्ते संपन्न झाले.याप्रसंगी विशेष उपस्थित पालक प्रतिनिधी अक्षय घोडके,शाळेचे प्राचार्य कृष्णा गांडूळे , समन्वयक प्रतिक्षा साळवे होत्या.शाळेच्या वतीने मान्यवरांचे यथोचित स्वागत करण्यात आले . उपस्थित विद्यार्थ्यांनी पथसंचलन करून मानवंदना दिली . राष्ट्रगीताने स्पोर्ट डे ची सुरुवात झाली .

विद्यार्थ्यांच्या क्रीडा कौशल्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध मैदानी खेळ तसेच आनंददायी खेळ या आठवड्यात घेण्यात येवून गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार



आहे.आपण खेळा बरोबर स्वतः च्या आरोग्याची काळजी घेणं आवश्यक आहे तसेच नियमित व्यायाम आणि आहारात संतुलन असायला हवे ,असे मत प्रा.बरकसे यांनी मनोगत व्यक्त करताना केले. पालक प्रतिनिधी अक्षय घोडके यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले . या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कृष्णा गांडूळे यांच्या मार्गदर्शनाखाली व समन्वयक प्रतिक्षा साळवे ,सहशिक्षिका युगंधरा गोरकर, कशिश शेख, आश्मा पठाण, निकिता कदम, ऋतूजा गव्हाणे,नाझमीन शेख, सहशिक्षक प्रदिप चव्हाण आणि वैभव निवारे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन इयत्ता दुसरीच्या ओवी पवार आणि श्रेयश चव्हाण यांनी तर आभार कु.प्रांजल काकडे हिने मानले.

# शहादा कृषी उत्पन्न बाजार समितीसमोर कार–मोटरसायकलचा भीषण अपघात

### यात्रेवरून परतणारा तरुण गंभीर जखमी


दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

शहादा–दोंडाईचा रस्त्यावरील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कापूस खरेदी–विक्री केंद्रासमोर गुरुवारी सायंकाळी एक भीषण अपघाताची घटना घडली. भरधाव ब्रिजा कार आणि मोटरसायकल यांच्यात झालेल्या समोरासमोर धडकेत मोटरसायकलस्वार गंभीर जखमी झाला असून दोन्ही वाहनांचा अक्षरशः चक्काचूर झाला आहे.

**नेमकी घटना काय?**

मिळालेल्या माहितीनुसार, १८ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ५:३० वाजेच्या सुमारास हा अपघात झाला. एक ब्रिजा कार शहाद्याकडून दोंडाईचाच्या दिशेने जात होती. याच वेळी सारंखेडा येथील प्रसिद्ध चेतक यात्रा करून आपल्या घराकडे परतणाऱ्या मोटरसायकलस्वाराला (क्रमांक: चक१८ उऊ४२२४) या कारने समोरून जोराची धडक दिली. धडक इतकी भीषण होती की मोटरसायकलचे दोन तुकडे झाले, तर कारच्या पुढील भागाचेही प्रचंड नुकसान झाले आहे.

**सावधान: सारंखेडा यात्रेनिमित्त सध्या रस्त्यांवर वाहनांची मोठी गर्दी आहे. वाहनधारकांनी वेगावर मर्यादा राखून प्रवास करावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात येत आहे.**



**कारला नंबर प्लेट नव्हती**

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त ब्रिजा कारला नंबर प्लेट नव्हती, ज्यामुळे संशय व्यक्त केला जात आहे. अपघातानंतर परिसरात बघ्यांची मोठी गर्दी जमली होती. स्थानिक नागरिकांनी प्रसंगावधान राखून गंभीर जखमी झालेल्या मोटरसायकलस्वाराला तातडीने जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी हलवले.

**सारंखेडा पोलिसांत अद्याप नोंद नाही**

सदर अपघात स्थळ हे सारंखेडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत येते. या भीषण अपघाताची माहिती मिळताच पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवली आहेत. मात्र, रात्री उशिरापर्यंत या घटनेची कोणतीही अधिकृत नोंद पोलीस ठाण्यात करण्यात आली नव्हती. अपघाताचे नेमके कारण काय, कार चालक मद्यधुंद होता का, की ओव्हरटेकिंगच्या नादात हा अपघात झाला, याचा तपास पोलीस करत आहेत.

# बोरफडी फाटा ते हिवरा पहाडी रस्त्याच्या विकासा बाबत मंत्री पंकजा मुंडे यांचे सकारात्मक पाऊल–युवा सरपंच घुगे

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

मौजे बोरफडी गावचे कार्यतत्पर युवा सरपंच कैलास घुगे यांनी मुंबई येथे जाऊन बोरफडी फाटा ते हिवरापहाडी या रस्त्याच्या विकास कामाबाबत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या सोबत सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली असून लवकरच या रस्त्याचे काम मार्गी लागेल असे कैलास घुगे यांनी सांगितले.या बैठकी दरम्यान ताई साहेबांनी विषयाची गंभीर दखल घेत संबंधित विभागाला तात्काळ आवश्यक सूचना दिल्या.सदर रस्त्याचे प्रलंबित काम लवकरच मार्गी लागेल, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला.या रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे परिसरातील नागरिकांना होत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन तातडीने निर्णय घेण्यात आला असून,लवकरच परिसरातील नागरिकांना दिलासा मिळेल,अशी अपेक्षा युवा सरपंच कैलास घुगे यांनी व्यक्त केली आहे.

**जनतेसाठी विकास, विकासासाठी कृती!**

हे ब्रीद वाक्य घेऊन मौजे बोरफडी गावचा विकास विविध योजनांच्या माध्यमातून साधला असून



लवकरच होवू घातलेल्या जिल्हा परिषद निवडणुकीत पाली जिल्हा परिषद गटामध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुक रिंगणात कैलास घुगे उतरणार आहेत.गावाच्या विकासानंतर जिल्हा परिषद गटाचा विकास करण्यासाठी कैलास घुगे यांना भागातील मतदारांनी सहकार्य केले पाहिजे असे मत परिसरातील नागरिकांनी व्यक्त केले आहे. विकास हेच ध्येय घेऊन कामांचा सपाटा लावलेले युवा सरपंच कैलास घुगे यांना जिल्हा परिषदेत पाठवुन भागाचा सर्वांगीण विकास साधण्याचा मार्ग मोकळा केला पाहिजे असे मत परिसरातील नागरिकांनी व्यक्त केलं आहे.

# सोनवल विद्यालयात 'आनंद मेळावा' उत्साहात साजरा; १० हजारांच्या खाद्यपदार्थांची विक्री

दैनिक वादळ वार्ता
**नंदुरबार । दिपक गोसावी**

येथील प्रेरणा शिक्षण संस्थेअंतर्गत कार्यरत किशोर सखाराम महाजन माध्यमिक विद्यालय आणि लिटल स्टार्स इंग्लिश मीडियम स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेत 'आनंद मेळावा' मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्यात नर्सरी ते इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवत आपल्या व्यावसायिक कौशल्याची झलक दाखवली. मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेले विविध खाद्यपदार्थ होते. व्यवहारासाठी शाळेतर्फे 'कुपन सिस्टीम' राबवण्यात आली होती. दिवसभरात विद्यार्थ्यांनी सुमारे ८ ते १० हजार रुपयांच्या खाद्यपदार्थांची विक्री केली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहार आणि नियोजनाचे प्रत्यक्ष शिक्षण मिळाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक सुधीर सोनवणे होते. त्यांनी विद्यार्थ्यांना आनंद मेळाव्याचे जीवनातील महत्त्व पटवून दिले. संस्थेचे सचिव किशोर महाजन आणि अध्यक्षा सुचेता महाजन यांनी भ्रमणध्वनीद्वारे विद्यार्थ्यांचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या. या मेळाव्याला पालक वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून दाद दिली. पालकांच्या प्रतिसादामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह दिसून आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रवीण भामरे, हेमंत महाजन, गौतम महिरे, हेमंत पवार, सूर्यकांत भामरे, हर्षल सोनवणे आणि प्रमिला माळी यांनी परिश्रम घेतले. तसेच इंग्लिश मीडियमचे मुख्याध्यापक दीपक पाटील, पूजा मॅडम, माधुरी पाटील, दिनेश पाटील, सतीश वाडीले व सर्व शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने हा कार्यक्रम अतिशय छान पद्धतीने साजरा करण्यात आला.




हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077